पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/1598 /१७
पुणे १ दिनांक :- 26/9 /२०१७

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
पसायदान प्रतिष्ठान आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे संचलित ज्ञानगंगा इंग्लिश स्कूल, आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे

विषय:- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:-१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १,६ व २४) २०१२
२)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २० जून २०१२
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क. एसएफएस-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम-२, दि. ३१/५/२०१७
४) मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे यांचे पत्र क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७/४३७० दि. १/७/२०१७

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार, शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्याचे परिपत्रक काढले होते. तदनंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ राज्यांत लागु झाल्या आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमकरीता दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून राज्यात आजतागायत सुरु आहेत. सदर इंग्रजी शाळा हया बहुतांशपणे शहरी भागांत आहेत. त्यामुळे सदर शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावरील जागेबाबतच्या अटींचे पालन करणे आवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता व मा. न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ मधील तरतुदींची पुर्तता करणाऱ्या इंग्रजी प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर विशेष बाब म्हणून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून वरील संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| ४ | पसायदान प्रतिष्ठान आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे | ज्ञानगंगा इंग्लिश स्कूल, आळंदी देवाची ता. खेड, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक इ १ ते ५ | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

अटी व शर्ती

.१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
.२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
.३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
.४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
.५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
.६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
.७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
.८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
.९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
.१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
.२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
.३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
.४. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खेड

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/२८ /2019
पुणे 1 दिनांक :-१८/ १ /2019

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**पसायदान प्रतिष्ठाण,मु.पो.आळंदी देवाची,ता.खेड,जि.पुणे संचलित ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे**

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-1019/प्र.क्र.1246/एसएम2, दिनांक-20.9.2019
3.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे जा.क्र.शिउसं/प्राथ-202/स्वयंअशाळा/पुवि/2019/7408, दिनांक-10.10.209

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक शाळेला जोडून ते उच्चप्राथमिक इ. 6 वी ते इ. 8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | **पसायदान प्रतिष्ठाण, मु.पो.आळंदी देवाची,ता.खेड,जि.पुणे** | **ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे** | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक शाळेला जोडुन ते उच्च प्राथमिक इ. 6 वी ते इ.8 वी | 2019-20 |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वयेसन 2019-20 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7..महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. एसएफएस-1019/प्र.क्र.1246/एसएम2, दिनांक-20.9.2019 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

18/1/2020
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.

**शिक्षण विभाग माध्यमिक**
**यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे सोमवार पेठ पुणे ११**
कार्या दुरध्वनी-०२०-२६०५०७३३ मेल आयडी- rmsapunezp@gmail

---

जाक्र.जिप/शिक्षण/माध्य/ 3101 /२०२० दि. 7/8 /२०२०
परवानगी वर्ष-२०१९-२०२०
परवानगी प्रकार-दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष-२०१९-२०२०

**स्वयंअर्थसहायीत तत्वावर परवानगी प्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

**प्रति,**

१. अध्यक्ष/सचिव पसायदान प्रतिष्ठान मु.पो.आळंदी देवाची ता.खेड जि.पुणे
२. मुख्याध्यापक/प्राचार्य ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कुल आळंदी देवाची ता.खेड जि.पुणे

**विषय- स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत (इय-ता ९ वी ).**
संदर्भ-१.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियम अधिनियम-२०१२ .
२.शासन निर्णय क्र एसएफएस-१०१६/प्रक्र १४२/एसएम-२ दि.१४ जुलै २०१७.
३.शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडील पत्र जाक्र उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
४.शासन निर्णय क्र एसएफएस-१०१७/प्रक्र.१६९/एय.एय-२ दि.०६/०५/२०१७.
५.संबधित शाळेकडील प्रस्ताव **दिनांक २२/१०/२०१९.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम -२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र ४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र .५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गाना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग इय-ता व शाखा | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि. दिनांक १२४६ दि.२०/९/२०१९ | पसायदान प्रतिष्ठान मु.पो.आळंदी देवाची ता.खेड | ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कूल , आंळदी देवाची ता.खेड | इंग्रजी | राज्य मंडळ | इ. ९ वी च्या वर्गास नैसर्गिक वाढ मिळणे | २०१९-२० ते २०२३-२०२४ | पाच वर्षासाठी |

**अटी व शर्ती**

१.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे आवश्यक आहे.
२.परवानगी देण्यात आलेल्या शाळेस,(अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल
४.U-Dise (Unified District Information System for Education ) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अदयावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.
५.सर्व संबधिताच्या माहितीसाठी स्वयंअर्थसहायित तत्वावरील नवीन दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

**शिक्षण विभाग माध्यमिक**
**यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे सोमवार पेठ पुणे ११**
कार्या दुरध्वनी-०२०-२६०५०७३३ मेल आयडी- rmsapunezp@gmail

जाक्र.जिप/शिक्षण/माध्य/ 2282 /२०२० दि. 20/8 /२०२०
परवानगी वर्ष-२०१९-२०२०
परवानगी प्रकार-दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष-२०१९-२०२०

**स्वयंअर्थसहायीत तत्वावर परवानगी प्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

**प्रति,**

१. अध्यक्ष/सचिव पसायदान प्रतिष्ठान मु.पो.आळंदी देवाची ता.खेड जि.पुणे
२. मुख्याध्यापक/प्राचार्य ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कुल आळंदी देवाची ता.खेड जि.पुणे

**विषय- स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत (इय-ता ९ वी ).**

संदर्भ-१.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियम अधिनियम-२०१२ .
२.शासन निर्णय क्र एसएफएस-२०१६/प्रक्र १४२/एसएम-२ दि.१४ जुलै २०१७.
३.शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडील पत्र जाक्र उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
४.शासन निर्णय क्र एसएफएस-२०१७/प्रक्र.१६९/एय.एय-२ दि.०६/०५/२०१७.
५.संबधित शाळेकडील प्रस्ताव **दिनांक १०/८/२०२०**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम -२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र ४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र .५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गाना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग इय-ता व शाखा | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि. दिनांक १२४६ दि.२०/९/२०१९ | पसायदान प्रतिष्ठान मु.पो.आळंदी देवाची ता.खेड | ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कूल , आंळदी देवाची ता.खेड | इंग्रजी | राज्य मंडळ | इ. १० वी च्या वर्गास नैसर्गिक वाढ मिळणे | २०१९-२० ते २०२३-२०२४ | पाच वर्षासाठी |

**अटी व शर्ती**

१.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.परवानगी देण्यात आलेल्या शाळेस,(अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल

४.U-Dise (Unified District Information System for Education ) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अदयावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.

५.सर्व संबधिताच्या माहितीसाठी स्वयंअर्थसहायित तत्वावरील नवीन दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

प्रथम मान्यता २०२४-२५
माध्यम : इंग्रजी
स्वयंअर्थ सहाय्यित शाळा

जा.क.शिउसं/उमाशि-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२५/ई-ऑफिस
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

प्रति
प्राचार्य, ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, देवाची, खेड, जि. पुणे

विषय - सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रथम मान्यता देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१९/प्र.क्र.१२४६/एसएम-२ दि.२०/०९/२०१९
३.या कार्यालयाचे जा.क्र.शिऊस/प्राथ-२/स्वयंअ शाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/७४० दि.१०/१०/२०१९
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे यांचे जा.क्र.९२४४/२०२४ दि.०८.०८.२०२४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेस २०१९-२० वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत संदर्भ क्रमांक २ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. त्या प्रस्तावानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्रमांक ४ च्या शिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन पत्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | पसायदान प्रतिष्ठाण, मु. पो. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे | ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, आळंदी देवाची, ता खेड, जि पुणे | इंग्रजी | राज्यमंडळ | उच्च माध्यमिक इ.११वी विज्ञान शाखा स्वयंअर्थसहाय्यित | २०२४-२५ |

अटी व शर्ती-

१. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.

२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी

३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी

४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी

५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही

७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल

८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून असेल.

९ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र मराठी/इंग्रजी उच्च माध्यमिक नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

११ महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही

१२ महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-Dise मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१३ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील

१४ सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

**इतर अटी :-**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी

२.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.
शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा

Signed by Sunanda Tukaram Wakhare
Date: 10-06-2025 10:24:17

**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे-१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

**१ मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२**
**२ मा. आयुक्त,शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे- १**
**३ मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**

**१ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.**
**२ पसायदान प्रतिष्ठाण, मु. पो. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे**

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- ४३८०

तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

- 1 JUL 2017

प्रति
अध्यक्ष/सचिव,
पसायदान प्रतिष्ठाण आळंदी देवाची ता-खेड, जि-पुणे

विषय - राज्यात सन २०१० मध्ये सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहायय तत्वावर परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**
**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**
**३. शासन निर्णय इमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. ३१.०५.२०१७.**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवुन इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहायियत शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासुन राज्यात आजतागायत सुरु आहेत. सदर इंग्रजी शाळा हया बहुतांशपणे शहरी भागात आहे. त्यामुळे सदर शाळांना स्वयं अर्थसहायय तत्वावरील जागेबाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता व मा. न्यायालयाने दिलेले निदेश विचारात घेता विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवुन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींची पुर्तता करणा-या इंग्रजी प्राथमिक शाळांना स्वयं अर्थ सहायियत तत्वावर विशेष बाब म्हणून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासुन आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तींवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ४ | पुणे | पसायदान प्रतिष्ठाण आळंदी देवाची ता-खेड, जि-पुणे | ज्ञानगंगा इंग्लिश स्कूल, आळंदी देवाची, ता-खेड, जि-पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | इ. १ ली ते ५ वी | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसुचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. मधील तसेच यापुढे या संबंधित शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या पुढील आदेशांचे पालन करणे. त्याचप्रमाणे, भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील. यामध्ये खेळाच्या मैदानासाठी लागणा-या जागेची अट क्र.२ च्या अटीच्या अधीन राहून शिथिल करण्यात येत आहे.
२. संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद/ महानगरपालिका/ नगरपलिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांचेकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमतः यांचेकडे आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात यावी.
३. एका मुलासाठी एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार निर्धारित केलेले असावे.
४. संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.
५. उपरोक्त बाबींची पुर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासुन **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावांची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणा-या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.
६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.
७. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळाबाबत U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित शाळा** म्हणून नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुबंई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.
८. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ व नियम २०१४ आणि २०१६ नुसार शाळेस शैक्षणिक शुल्क निर्धारित करणे बंधनकारक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा. रा.ग.गुंजाळ, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे.

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/ 6808

तात्काळ/महत्वाचे

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

कालमर्यादा

दिनांकः- 10 OCT 2019

प्रति

अध्यक्ष/सचिव,

पसायदान प्रतिष्ठाण, मु.पो. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे

विषय - सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र एसएफएस-२०१९/प्र.क्र.१२४६/एसएम-२ दिनांक २०.०९.२०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णय नुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | पसायदान प्रतिष्ठाण, मु.पो. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे | ज्ञानगंगा इंग्लिश मिडिअम स्कुल, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे | इंग्रजी | दर्जावाढ (राज्यमंडळ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ६ वी ते इयत्ता १२ वी) सर्व शाखा | २०१९-२० |

अटी व शर्ती :-

१. शासन निर्णय संदर्भ क्र ३ मधील अट क्र. १ नुसार संस्थेने सदर प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपूर्वीच सुरू केली नसल्याची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यास संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिप पुणे यांनी सदर शाळेकडून रूपये एक लक्ष इतका दंड वसूल करून त्याचा अहवाल शासनास व या कार्यालयास सादर करण्यात यावा. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याची खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी.**

२. सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३. पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

५. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

१०. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(प्रविण अहिरे)

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.